# जिल्हाधिकारी,अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती

क्रमांक/अ.का./प्र.अ./भूसंपादन/कावि- ९७ /२०१८ दिनांक :-२६/१०/२०१८

## कलम ११ अधिसूचना

**(भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)**

**प्रकरण क्रमांक :- ०५/४७/२०१३-१४ मौजा - तातरा, ता.धारणी, जि.अमरावती**

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतूकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रं. संकीर्ण ११/२०१४/ प्र.क्रं.७७/अ-२,दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याव्दारे, असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची I मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त जमिन** असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेली आहे. उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतूदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची गरज आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमी संपादनच्या अनूषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे या सोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्याअर्थी, सामाजीक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अ नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द दिनांका पासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सूट देता येईल.

परंतु, आणखी असे कि, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात

यापुढे जांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्या प्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याआर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी **भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धारणी** यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

जमिनीचे वर्णन

**गाव :- तातरा तालुका :- धारणी जिल्हा :- अमरावती**

| अ.क्र. | भूमापन क्र. किंवा गट क्र. (सं.मो.प्रमाणे चालता क्र.) | संपादीत क्षेत्र ( हे.आर.) |
|---|---|---|
| १ | १ | ०.२८ |
| २ | २ | ०.३५ |
| ३ | ३ | ०.०९ |
| ४ | ८ | १.२५ |
| ५ | ५६ अ | ०.०५ |
| ६ | ५६ क | ०.१० |
| ७ | ५८ अ | ०.९७ |
| ८ | ५८ ब | ०.९८ |
| ९ | ५८ क | ०.९७ |
| १० | ८६ | ०.१६ |
| | **भूसंपादनाचे एकूण क्षेत्र :-** | **५.२०** |

## अनुसूची - दोन

**सार्वजनीक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** :- **गर्गा मध्यम प्रकल्प**

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- **गर्गा मध्यम प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरीता**

**समाजाला मिळणारे लाभ** :- प्रकल्पामुळे आदिवासी व डोंगराळ भागातील ४२८१.०० हे.आर.जमीनीस लाभ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे.तसेच पिण्याच्या पाण्याची समस्या सुटणार आहे. तसेच औद्योगीक वापराकरता पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे आदिवासी ग्रामस्तांचे जीवनमान उंचावुन रोजगार तसेच आर्थिक प्रगती साध्य होणार आहे.

## अनुसूची - तीन

**बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भागपाडणारी कारणे** : सदर प्रकरणी विस्तापन होत नाही.
सबब माहिती **निरंक**

## अनुसूची - चार

## (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सांराश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने) सामाजिक प्रभाग निर्धारण सांराश

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ महसुल व वन विभाग, मुंबई दिनांक १३ मार्च, २०१५ मधिल अधिसूचना अन्वये सुट देण्यात आली आहे.**

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | :- | **प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.** |
| (ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | :- | **निरंक** |
| (क) ज्या अधिसूचनाद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील | :- | **निरंक** |

टिप :- उक्त जमिनीचे आराखड्याचे भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धारणी यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :-२६/१०/२०१८
ठिकाण :- अमरावती.

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी, धारणी**

26/10/18
**(अभिजीत बांगर)**
**जिल्हाधिकारी, अमरावती.**